सत्यमेव जयते

Government of India

युवक कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय

महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

NOT ME BUT YOU

# शासकीय तंत्रनिकेतन जळगाव

## राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत

## कौशल्य विकास विशेष निवासी शिबीर

## Youth for my Bharat & Youth for digital literacy

# :अहवाल:

**मंगळवार दि,२४/१/२०२५ ते गुरवार, दि. ३०/१/२०२५**

**स्थळ: : उमाळा , ता. जि. जळगाव**

## प्रास्ताविक

आमच्या शासकीय तंत्रनिकेतन राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत **कौशल्य विकास विशेष निवासी शिबीर** मु. पो. उमाळा , ता. जि. जळगाव येथे आयोजित करण्यात आले होते. शिबीर कालावधीत खालील प्रमाणे विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले व शिबिरार्थींना योग्य मार्गदर्शन मिळाले.

## स्वरूप

शिबिर उद्घाटन सोहळा

उमाळा (ता. जि. जळगाव), केंद्रीय युवा व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र शासन पुरस्कृत तसेच तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या सौजन्याने शासकीय तंत्रनिकेतन, जळगावच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत उमाळा येथे विशेष कौशल्य विकास शिबिराचे भव्य उद्घाटन पार पडले.



तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

यांच्या सौजन्याने

शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव

द्वारा आयोजित

राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत

"कौशल्य विकास विशेष निवासी शिबीर"

•शिबिर उद्घाटन सोहळा•

मंगळवार दि. २८.०१.२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता

ठिकाण : महामहेश्वर मंदिर परिसर, उमाळा, ता./जि. जळगाव

•उद्घाटक•

सौ. फकीरा सुखदेव कोलते, सरपंच, उमाळा

•प्रमुख मार्गदर्शक आणि सल्लागार•

मा. डॉ. विनोद मोहितकर, संचालक, डीटीई     मा. श्री. जी. व्ही. गर्जे, सह-संचालक

डॉ. सचिन नांद्रे, संचालक, रा. से. यो., कबचौउमवि, जळगाव

मा. डॉ. पराग एम. पाटील. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव

मा. डॉ. प्रसाद पी. चौधरी, उप-प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव

श्रीमती एस. पी. भागवत, प्रबंधक, शांतनि, जळगाव

श्री. मनीष पी. जाधव, कार्यालय अधीक्षक, शांतनि, जळगाव

•विशेष सन्माननीय अतिथि•

मा.श्री. कैलास शिवराम बिऱ्हाडे (चेअरमन, उमा महेश्वर मंदिर ट्रस्ट, उमाळा)

मा.श्री. रंगनाथ दगडू बिऱ्हाडे (पोलिस पाटील, उमाळा)

मा. श्री. भोजराज फालक (ग्रामसेवक, उमाळा)

मा. श्री. ज्ञानेश्वर नथ्थू खडसे (चेअरमन, वि. का.सो. उमाळा)

तरुण भारत
02 Feb 2025 - Page 2
epaper.tarunbharatlive.com



# राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत उमाळा येथे विशेष कौशल्य विकास शिबिराचे उद्घाटन

**जळगाव** : तालुक्यातील उमाळा येथे केंद्रीय युवा व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र शासन पुरस्कृत तसेच तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या सौजन्याने शासकीय तंत्रनिकेतन, जळगावच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विशेष कौशल्य विकास शिबिराचे उद्घाटन झाले.

शिबिराचे उद्घाटन उमाळा गावच्या सरपंच प्रमिला सुखदेव कोलते आणि सुखदेव कोलते तसेच माजी सरपंच मनोहरराव पाटील आणि शासकीय तंत्र निकेतन प्रतिनिधी स्वरुपात रा से. यो. समन्वयक डॉ. विवेक कहाळे यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराचे आयोजन उमा महेश्वर मंदिराच्या प्रांगणात करण्यात आले होते. या वेळी सरपंच प्रमिला कोलते यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या या उपक्रमाचे कौतुक करत, ''अशा शिबिरांचे आयोजन दरवर्षी व्हावे आणि गाव समजून घेऊन ग्रामीण विकासात युवकांनी महत्त्वाची भूमिका पार पाडावी,'' असे आवाहन केले.

या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार असून, ग्रामीण विकास, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकी यावर विशेष भर दिला जाणार आहे. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ग्रामस्थ आणि युवकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शिबिराच्या आयोजनात प्राचार्य डॉ. पराग पाटील, उपप्राचार्य डॉ. पी. पी. चौधरी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. रा. से. यो. समन्वयक डॉ. विवेक कहाळे, सह-समन्वयक प्रा. संदीप ढमाले, डॉ. चैताली पवार, प्रा. पूनम नेमाडे, रा. से. यो. सदस्य प्रा. रूपाली देशपांडे, प्रा.निखिल वराडे, प्रा.नामदेव आंधळे आणि प्रा. सरिता जैन व डॉ. स्मिता सरवदे यांनी विशेष भूमिका बजावली. तसेच स्वयंसेवकांनी परिश्रम घेत संवाद यात्रा यशस्वी केली.

## *शिबिराचे उद्दिष्टे*

विविध कौशल्य विकास, सक्षम युवा-समर्थ भारत, महिला सबलीकरण, श्रम संस्कार, आरोग्याची काळजी व निगा, स्वच्छता अभियान, बालविवाह रोखण्यासाठी समाज प्रबोधन, जलव्यवस्थापन व संवर्धन आणि वृक्ष संवर्धन

## *रा.से.यो.शिबिर दैनंदिनी*

| वेळ | दैनंदिन कार्यक्रम |
|---|---|
| स. ६:०० ते ७:१५ | व्यायाम व योग प्रशिक्षण |
| स. ७:१५ ते ८:०० | चहापान व अल्पोपहार |
| स. ८:०० ते ११:३० | श्रमदान |
| स. ११:३० ते १:०० | भोजन |
| दु. १:०० ते २:०० | विश्रांती |
| दु. २:०० ते ६:०० | विविध उपक्रम |
| सायं. ६:३० ते ७:३० | जनसंपर्क |
| सायं. ७:३० ते ८:३० | भोजन |
| सायं. ८:३० ते ९:३० | सांस्कृतिक कार्यक्रम |
| सायं. ९:३० ते १०:०० | अहवाल लेखन |

**“संवाद यात्रा" उमाळा** तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई, तसेच शासकीय तंत्र निकेतन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 28 जानेवारी 2025 रोजी उमाळा (ता. जि. जळगाव) येथे विशेष कौशल्य विकास निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराअंतर्गत "संवाद यात्रा" काढण्यात आली.यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गावभर फिरून नागरिकांशी संवाद साधला. आरोग्य, शिक्षण, व्यवसाय आणि इतर समस्यांबाबत माहिती घेत ग्रामीण भागातील विकासाच्या संधी शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला. गावकऱ्यांनी या संवाद यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि त्यांच्या समस्या तसेच गरजा मांडल्या.

ग्रामस्थ सुरेश धनगर, ग्रामपंचायत सदस्य, यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. "हा अनुभव अत्यंत वेगळा असून यातून ग्रमविकासासाठी प्रेरणा मिळेल," असे त्यांनी सांगितले.













**जळगाव तरुण भारत**

03 Feb 2025 - Page 10
epaper.tarunbharatlive.com

# शासकीय तंत्रनिकेतनच्या 'रा.से.यो'च्या माध्यमातून उमाळा येथे संवाद यात्रा



**जळगाव** : तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई तसेच शासकीय तंत्र निकेतन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने उमाळा (ता. जळगाव) येथे विशेष कौशल्य विकास निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराअंतर्गत संवाद यात्रा काढण्यात आली.

यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गावभर फिरून नागरिकांशी संवाद साधला. आरोग्य, शिक्षण, व्यवसाय आणि इतर समस्यांबाबत माहिती घेत ग्रामीण भागातील विकासाच्या संधी शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला. गावकऱ्यांनी या संवाद यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि त्यांच्या समस्या तसेच गरजा मांडल्या. ग्रामस्थ सुरेश धनगर, ग्राम पंचायत सदस्य यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. 'हा अनुभव अत्यंत वेगळा असून यातून ग्राम विकासासाठी प्रेरणा मिळेल' असे त्यांनी सांगितले.

संवाद यात्रेस उमाळा ग्राम पंचायतीचे ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच तसेच सर्व सदस्यांनी सहकार्य केले आणि हा उपक्रम गावाच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरेल, असे मत व्यक्त केले. शिबिराच्या आयोजनात रा. से. यो. समन्वयक डॉ. विवेक कहाळे, सह-समन्वयक प्रा. संदीप ढमाले, डॉ. चैताली पवार, प्रा. पूनम नेमाडे, रा. से. यो. सदस्य प्रा. रूपाली देशपांडे, प्रा. निखिल वराडे, प्रा. नामदेव आंधळे, प्रा. सरिता जैन व डॉ. स्मिता सरवदे यांनी विशेष भूमिका बजावली. उपक्रमामुळे उमाळा गावातील सामाजिक जाणिवा वाढीस लागल्या असून ग्रामीण भागाच्या विकासासाठी नव्या संधी उपलब्ध होण्याची आशा निर्माण झाली आहे.

## योग आणि ध्यान







## :व्याख्यानमाला:

**संवेदनशीलतेतून नेतृत्व उमलते - डॉ. एम. व्ही. इंगळे**

उमाळा (ता. जि. जळगाव),– राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत उमाळा येथे सुरू असलेल्या विशेष कौशल्य विकास शिबिरात मार्गदर्शनपर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानमालेस शासकीय तंत्रनिकेतन, जळगावचे माजी प्राचार्य डॉ. एम. व्ही. इंगळे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. इंगळे म्हणाले, "संवेदनशीलतेतून नेतृत्व निर्माण होते आणि जबाबदारीच्या भावनेतून व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो." सामाजिक जाणीव, कर्तव्य आणि जबाबदारी या नेतृत्वाच्या विकासासाठी महत्त्वाच्या आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.तसेच, त्यांनी तरुणांनी नवकल्पना (Innovation) आणि सर्जनशीलता (Creativity) जोपासण्याचे महत्त्व सांगितले. या व्याख्यानाला गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिबिरार्थी आणि विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनातून नेतृत्वगुण, नवोन्मेष आणि सामाजिक बांधिलकी या संदर्भात प्रेरणा घेतली.

याप्रसंगी शासकीय तंत्रनिकेतन, जळगावच्या अनुविद्युत विभागाचे विभागप्रमुख डॉ. कें. पी. अकोले उपस्थित होते.






**रा. से. यो. शिबिरार्थींनी गावकऱ्यांना दिले डिजिटल साक्षरतेचे प्रशिक्षण**

उच्च व तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई, आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या सौजन्याने शासकीय तंत्रनिकेतन, जळगावच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत 'विशेष कौशल्य विकास शिबिर' उमाळा येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात सहभागी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गावकऱ्यांना डिजिटल साक्षरतेचे महत्त्व समजावून सांगत प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले.

गावकऱ्यांना डिजिटल तंत्रज्ञानाच्या उपयोगासंदर्भात मार्गदर्शन करताना ऑनलाईन पेमेंट प्रणाली, शासकीय योजनांची माहिती मिळवण्याच्या पद्धती, डिजिटल व्यवहार आणि शेतकरी हिताच्या योजनांचा लाभ कसा घ्यावा यावर विशेष भर देण्यात आला. तसेच, ईपीक पाहणीच्या माध्यमातून पीक पेरा ऑनलाईन नोंदणी कशी करावी, याची प्रात्यक्षिके घेत गावकऱ्यांना डिजिटल तंत्रज्ञानाचा स्वतःहून वापर करण्यास सक्षम बनवण्यात आले.

यासाठी प्रा. हर्षल नेमाडे यांनी पुढाकार घेत, विद्यार्थ्यांचे गट तयार करून गावकऱ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. गावकऱ्यांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत अशा उपयुक्त उपक्रमांचे आयोजन नियमित होण्याची अपेक्षा व्यक्त केली.





**डिजिटल साक्षरता ही समृद्ध भारताची ओळख - प्रा. हर्षल नेमाडे**

प्रा. नेमाडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शहरी भागात डिजिटल साक्षरतेचे प्रमाण जास्त असले तरी ग्रामीण भागातही त्याचा प्रसार होणे गरजेचे आहे. भारत सरकारच्या "डिजिटल इंडिया" मोहिमेअंतर्गत, डिजिटल व्यवहार, ई-गव्हर्नन्स, ऑनलाईन शिक्षण आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे ग्रामीण भागात मोठे परिवर्तन घडू शकते.


याप्रसंगी शासकीय तंत्रनिकेतन, जळगावच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातील प्रा. जितेंद्र जोशी यांची उपस्थिती होती.

**स्वच्छतेची सुरवात स्वतःपासून करा- डॉ. राकेश दौंडे**

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत उमाळा येथे सुरू असलेल्या विशेष कौशल्य विकास शिबिरात मार्गदर्शनपर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. दुपारसत्रातील या व्याख्यानमालेस शासकीय तंत्रनिकेतन, जळगावचे औषधनिर्माण शास्त्र विभागातील डॉ. राकेश दौंडे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते.
"स्वच्छ भरत, स्वस्थ भारत" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. दौंडे म्हणाले की, स्वच्छता ही स्वतःपासून सुरू व्हायला हवी. ज्यातून आरोग्य राखले जाईल. प्रत्येकाने घर आणि परिसर स्वच्छ ठेवल्यास व त्याची निगा राखल्यास देश सुंदर होण्यास वेळ लागणार नाही. या व्याख्यानाला गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिबिरार्थी आणि विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी शासकीय तंत्रनिकेतन, जळगावच्या औषधनिर्माण शास्त्र विभागातील प्रा. सुनील गायकवाड यांची उपस्थिती होती.




GPS Map Camera
Umale, Maharashtra, India
Wj8v+88c, Umale, Maharashtra 425003, India
Lat 20.915861° Long 75.643541°
28/01/2025 02:34:22 PM GMT +05:30
Google







## अंगणवाडी, माध्यमिक आणि प्राथमिक विद्यालय भेट आणि थेट मार्गदर्शन

सर्व स्वयंसेवक शिभिरार्थिनी अंगणवाडी, माध्यमिक आणि प्राथमिक विद्यालय भेट देवून तेथील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व , आरोग्यविषयक माहिती  तसेच मूल्य शिक्षण म्हणजे, एखाद्या व्यक्तीच्या नैतिक विकासाला चालना देणारे शिक्षण. मूल्य शिक्षणामुळे व्यक्तींना नैतिक, सामाजिक आणि मानवी मूल्ये शिकतात. या मूल्यांमुळे त्यांचे वर्तन आणि दृष्टिकोन सकारात्मक बनते अश्या विषयावर थेट मार्गदर्शनपर ज्ञान प्रदान केले





**निवासी शिबिर समारोप सोहळा**

उमाळा (ता. जि. जळगाव), केंद्रीय युवा व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र शासन पुरस्कृत तसेच तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या सौजन्याने शासकीय तंत्रनिकेतन, जळगावच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत उमाळा येथे विशेष कौशल्य विकास शिबिराचे भव्य समारोप सोहळा मा. नायब तहसीलदार श्री राहुल वाघ ता. जि. जळगाव तसेच या कार्यक्रमाला उपसरपंच श्री संदीप कैलाश बिऱ्हाडे ग्रामपंचायत उमाळा, उपप्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन डॉ.पी.पी.चौधरी, श्री आर. वाय. पाटील अधिव्याख्याता स्थापत्य यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला

अशा शिबिरांचे आयोजन दरवर्षी व्हावे आणि गाव समजून घेऊन ग्रामीण विकासात युवकांनी महत्त्वाची भूमिका पार पाडावी," असे आवाहन केले. तसेच, ग्रामपंचायत अशा उपक्रमांना नेहमी सहकार्य करेल, असा विश्वास त्यांनी दिला.



शिबिराच्या आयोजनात रा. से. यो. समन्वयक डॉ. विवेक कहाळे, सह-समन्वयक प्रा. संदीप ढमाले, डॉ. चैताली पवार, प्रा. पूनम नेमाडे, रा. से. यो. सदस्य प्रा. रुपाली देशपांडे, प्रा. निखिल वराडे, प्रा. नामदेव आंधळे, प्रा. सरिता जैन आणि प्रा. स्मिता सरवदे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच, स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेत शिबिर यशस्वी केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. रुपाली देशपांडे, प्रा. स्मिता सरवदे यांनी केले. तर आभारप्रदर्शन रासेयोचे समन्वयक डॉ. विवेक कहाळे यांनी केले. शिबिराच्या आयोजनात प्राचार्य डॉ.पराग पाटील, उपप्राचार्य डॉ.पी.पी.चौधरी, यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रबंधक श्रीमती शर्वरी भागवत व कार्यालय अधीक्षक श्री मनीष जाधव यांनी सहकार्य केले.शासकीय तंत्रनिकेतन मधील सर्व मा. विभागप्रमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोदविला.







Powered by : eRaleGo.com

समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना (NSS)

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेत, जळगांव

GOVT. POLYTECHNIC JALGAON

GPJ NSS Report

शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव
राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME
तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई